**कार्यावली**

**सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता**
**मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या**
**सन २०२६ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाची कार्यावली.**

**एक** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे

**तीन** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**चार** : सन २०२६-२०२७ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**पाच** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**सहा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**सात** : शासकीय विधेयके

**आठ** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**नऊ** : शोक प्रस्ताव

**दहा** : इतर प्रस्ताव

**अकरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

**बारा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये

**तेरा** : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

(१) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्रातील भावी पिढीच्या शाश्वत भवितव्याची तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ - **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचे**

(२) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी विधेयक, २०२५ - **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांचे**

**चौदा** : **अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) -**

**श्री. संजय खोडके वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १, २ व ३**

(१) ''महाराष्ट्रामध्ये लागवडीखालील शेतीपैकी ८० % शेती ही कोरडवाहू लागवडीखाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या ज्या काही योजना या १५ ते २० वर्षात आल्या. त्या ओलीत लागवडीखालील शेतीकरिता आलेल्या आहेत. त्यामुळे ८० % शेतकरी हे शासकीय योजनेपासून किंवा सरकारच्या मदतीपासून

वंचित राहत आहेत, त्यामुळे कोरडवाहू लागवडीखालील शेती करिता जास्तीत जास्त योजना आखून त्याचा लाभ राज्यातील शेतकऱ्यांना देण्याबाबात शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागामध्ये शासकीय कर्मचारी, अधिकारी यांच्या नेमणुका न होणे, मोठ्या प्रमाणात अधिकारी-कर्मचाऱ्यांची कमतरता असणे, त्यामुळे राज्याच्या विकासाला व प्रशासकीय कामामध्ये खीळ निर्माण होणे, राज्य शासनाने खाजगी कंपन्यांमार्फत भरती करण्याचे अवलंबिलेले धोरण, तरीही त्या प्रमाणात सुसुत्रता निर्माण न होणे, 'महाराष्ट्र लोक सेवा आयोग' सारखी संस्था ज्याची विश्वासार्हता चांगली आहे, अशा संस्थेमार्फत भरती करणे किंवा राज्य शासनपुरस्कृत राज्य निवड मंडळे निर्माण करण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(३) "राज्यातील 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका यांना उत्पन्नाचे स्त्रोत कमी असणे, गृह कर व इतर अतिरिक्त कर वाढविण्याला मर्यादा असणे, त्यामुळे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात विकासाला खीळ बसणे, खेडे गावातील लोकसंख्या कमी होऊन शहरी लोकसंख्या सातत्याने वाढत असणे, ग्रामीण भागासाठी अनेक योजनांमधून पायाभूत विकासाकरिता निधी उपलब्ध होत असतो, त्याचप्रमाणे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात पायाभुत विकासाकरिता शासनाने विशेष अनुदान द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४, ५, ६, ७ व ८**

(४) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडेगावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५) "मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६) "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करुन त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७) "राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८) "मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटूंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच

मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैंकी विहित हिस्सा महानगरपालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महानगरपालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. वसंत खंडेलवाल वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९, १० व ११**

(९) ”राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१०) ”राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका यांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे”

(११) “राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने त्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्रीमती उमा खापरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १२, १३, १४, १५ व १६**

(१२) ”राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१३) ”राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च

माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१४) "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, तसेच राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१५) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१६) "राज्यात अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील दूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छीमार बांधवांच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणाच्या समस्येवर उपाय शोधून शासनाने प्रभावीरीत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अमित गोरखे वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १७**

(१७) महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती समाजाच्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत दलित वस्ती सुधार योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत रस्ते, गटारे, पिण्याचे पाणी, समाजमंदिरे, विद्युत सुविधा, सार्वजनिक स्वच्छता आदी विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो. मात्र, अनेक ठिकाणी सदर निधीचे इतर योजनांमध्ये वर्गीकरण करणे अथवा निधी इतरत्र वळवित असल्याने दलित वस्त्यांतील नागरिकांना अपेक्षित विकासकामांचा लाभ वेळेत मिळत नाही. त्यामुळे अनुसूचित जाती समाजामध्ये नाराजी निर्माण होत असून सामाजिक न्यायाच्या उद्देशालाच बाधा पोहोचत आहे.अनुसूचित जातींसाठी राखीव असलेला निधी हा त्याच समाजाच्या विकासासाठी खर्च होणे आवश्यक असून तो इतर कोणत्याही कारणासाठी वर्ग करण्यात येऊ नये, अशी मागणी सातत्याने होत आहे. सामाजिक समता व संविधानिक हक्कांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे अनुसूचित जातीसाठी मंजूर करण्यात येणारा दलित वस्ती सुधार योजनेचा निधी कोणत्याही इतर योजनेत वर्ग अथवा वळविण्यात येऊ नये तसेच संबंधित निधी केवळ दलित वस्त्यांमधील विकासकामांवरच खर्च करण्यात यावा, याबाबत शासन निर्णय

निर्गमित करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

**श्री. प्रसाद लाड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १९, २०, २१, २२ व २३**

(१९) ''महाराष्ट्रात अनेक नद्यांचा उगम होत असून या नद्यांच्याव्दारे पाण्याचा स्त्रोत मोठया प्रमाणावर उपलब्ध हा ेत असल्याने अनेक गावे सिंचनाखाली येत असून त्या परिसरातील गावे सुजलाम-सुफलाम होणे, अनेक शहरात देखील पुरेसा पाणीपुरवठा होत असल्याने उद्योगधंद्यात देखील वाढ होत असणे, सद्यस्थितीत अनेक ठिकाणी सिमेंटचे रस्ते बांधकाम होत असणे, अनेक नदी पात्राजवळ अवैध अतिक्रमणांमुळे या नद्यांचे पात्र कमी होत असणे, या नद्यांमध्ये गावातील तसेच शहरातील घाण व दुषित पाणी सोडण्यात येणे तसेच सिमेंटीकरणामुळे अनेक नद्यांची उगमस्थाने नष्ट होत असणे, अनेक ठिकाणी पाण्याचा नैसर्गिक स्त्रोत बंद करुन तेथे अवैध बांधकामे करण्यात येणे, नद्यांच्या नैसर्गिक स्त्रोतांचे जतन करून नद्यांच्या संवर्धनाकरिता पाण्याचे सनियंत्रण, तसेच अवैध अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाने निश्चित धोरण तयार करुन त्याची कठोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२०) ''मुला-मुलींना लहानाचे मोठे केल्यानंतर या मुलांकडून आपल्या आई-वडीलांची सतत अवहेलना अपमान करण्यात येत असणे, म्हातारपणी मुलगा/मुलगी आपला आधार आहे, अशी भोळी भाबडी आशा बाळगून आई-वडील आपल्या मुला-मुलींना कोणतीही गोष्ट कमी पडून देत नसणे, म्हातारपणी मुले आई-वडीलांची सेवा सुश्रुषा न करता त्यांना वृध्दाश्रमात अथवा इतरत्र सोडून देत असणे अथवा अपमानीत करून घराच्या बाहेर काढत असणे, आयुष्याच्या शेवटी मुला-सूनांकडून त्यांना योग्यप्रकारे वागणूक मिळत नसणे, म्हातारपणी मुलांनी आपल्या आई-वडीलांचा योग्यरित्या सांभाळ करावा त्यांची सेवा सुश्रूषा करावी याकरिता शासनाने निश्चित धोरण ठरवावे, अशी शिफारस हो विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२१) ''राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२२) ''राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२३) ”राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. सुनिल शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २५, २६, २७ व २९**

(२५) मुंबईतील (विशेषतः दक्षिण मुंबई पूर्व किनारपट्टीवर ) मुंबई पोर्ट ट्रस्ट (BPT) ची सुमारे ७५० ते १८०० एकर जमिन आहे. जमिनीवर आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल, व्यावसायिक संकुले आणि हरित क्षेत्र विकसित करण्याबाबत शासन नियोजन करीत आहे. मुंबईत सेंट्रल व पश्चिम रेल्वे, नेव्ही आणि केंद्र शासनाच्या इतर विभागांच्या अखत्यारीत देखील अनेक मैदाने आहेत. हि मैदाने केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडून खेळाव्यतिरीत अनेक कार्यक्रम आणि सोहळे यांसाठी भाड्याने दिली जातात. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येमुळे आणि विकासकामांमुळे अस्तित्वात असलेली मैदाने अपुरी पडत आहेत. त्यामुळे खेळाडूंची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. सन २०३६ मध्ये ऑलिम्पिकचे यजमानपद मिळवण्याचा देशाचा प्रयत्न असणार आहे. परंतु मुंबईतील युवा खेळाडू सक्षम सराव आणि प्रशिक्षण कुठे करायचे हा यक्ष प्रश्न पडला आहे. यास्तव भावी पिडीच्या खेळातील गुणवत्तेला वाव मिळण्यासाठी मुंबईतील केंद्र शासनाच्या विविध विभागांच्या अखत्यारीतील मैदाने सर्वसामान्य मुंबईकरांना खेळासाठी नाममात्र दरात किंवा मोफत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे”

(२६) “राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२७) “केंद्र शासनाच्या अखत्यारीतील दादर येथील इंदू मिल्सच्या जागेवर महामानव परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, सदरहू निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाची कीर्ती देशभरातच नव्हे तर पूर्ण जगभरात पसरलेली आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील छत्रपती श्री शाहू महाराज यांचे इतिहासातील योगदान अमुल्य आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे जन्मलेल्या छत्रपती शाहू महाराज यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेले काम अभूतपूर्व आहे, त्यांच्या या कामाची महती भावी पिढीस होणे गरजेचे आहे, यास्तव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील इंदू मिल्सच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य स्मारकाच्या धर्तीवर मुंबईतील ना. म. जोशी मार्ग व वरळी येथील सीताराम, पोद्दार व अपोलो मिल्स या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बंद गिरण्यांपैकी एका गिरणीच्या जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२९) ''राज्यात मुंबईसह इतर शहरांतील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेणाऱ्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरिता राज्य शासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री. विक्रम काळे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३०, ३१, ३२, ३३ व ३४**

(३०) ''राज्यात मोठ्या प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, दैनंदिन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यामुळे होणारी जीवितहानी हे टाळण्यासाठी तसेच वेळ व इंधनाची बचत आणि विकासाच्या दृष्टीने राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३१) ''राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३२) ''राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३३) ''राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३४) ''राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री. जगन्नाथ अभ्यंकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३५, ३७ व ३८**

(३५) ''मराठी माध्यमाच्या तसेच मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शेकडो शाळांना एकही शिक्षक मंजूर केलेला नाही. तसेच अनेक शाळांना ४ ते ५ वर्गांकरीता एक किंवा दोनच शिक्षक मंजूर केलेले आहेत. शून्य शिक्षक संख्या

मंजूर केलेल्या बऱ्याच शाळांमध्ये सध्या विद्यार्थी उपलब्ध आहेत, परंतू ते निकषात बसू न शकल्यामुळे विद्यार्थी संख्या ७० ते ८० असतांनाही तेथे एकही शिक्षकाचे पद मंजूर केल्या गेले नाही, अशा प्रकारे मराठी माध्यमाच्या शाळा व मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा विद्यार्थी संख्येचे समर्थन न मिळाल्यामुळे तेथे शिक्षकांची पदे शासनाने मंजूर केली नाहीत, त्यामुळे गोर गरीबांची मुले शिक्षण घेत असलेल्या ग्रामीण, आदिवासी व रात्र शाळेतील विद्यार्थ्यांना दोनच पर्याय उपलब्ध राहतील. एक तर त्यांना शाळाबाह्य व्हावे लागेल अथवा लांब दूरच्या गांवी शिक्षणाकरीता पायपीट करावी लागेल. मातृभाषेतून शिक्षण घेण्याची धडपड करणाऱ्या बालकांच्या शिक्षणाकरीता राज्य शासनाने यापूर्वी अनेकदा सर्व साधारण शिक्षक मंजूरीचे सूत्र ज्याप्रमाणे शिथिल केले होते, त्याच प्रमाणे मातृभाषेतील माध्यमाच्या शाळा वाचविण्याकरीता शिक्षक मंजूरीचे निकष शिथिल करुन या शाळांना संरक्षण द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३७) "राज्य शासनाचे आदेश दि.२४.०३.२०२६ अनुसार शिक्षण संचालकांनी आपले परिपत्रक दि. २९ एप्रिल, २०२६ अन्वये इयत्ता ९ वी व १० वी एकूण विद्यार्थी संख्या २० असली तरी तेथे ३ शिक्षक मंजूर करण्याचे धोरण जाहीर केले आहे. परंतू ही सवलत केवळ ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांकरीता लागू करण्यात आली. शहरामधील झोपडपट्टीच्या भागात असलेल्या शाळा व रात्र शाळा यांना सुध्दा सदर सवलतीची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा कमी पटसंख्या असलेल्या रात्रशाळा व शहरातील झोपडपट्टी भागातील शाळा शिक्षकाविना चालविण्याचा प्रसंग संस्थांवर येईल. ग्रामीण व शहरी शाळांतील इयत्ता ९ वी व १० वी ला शिक्षक मंजूरीच्या सूत्रामध्ये दिलेली सवलत भेदभाव करणारी असल्यामुळे ग्रामीण व शहरी झोपडपट्टी भागातील शाळांमधील व रात्र शाळातील इयत्ता ९ वी व १० वी च्या शिक्षक मंजूरीच्या सूत्रामध्ये समानता आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

(३८) "रात्रशाळेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या विशेष सेवांचा विचार करून राज्य शासनाने दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रात्रशाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा काही अटींचे अधीन राहून पूर्ण वेळ करण्याचा निर्णय घेतला होता.या निर्णयाचा लाभ बहुतांशी मुख्याध्यापकांनी आणि काही शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला. त्यांच्या सेवा पूर्णवेळ करण्यात आल्या आणि त्यांना नियमित वेतनश्रेणी देय ठरवण्यात आली. दरम्यान दिनांक ३० जून, २०२२ च्या शासन निर्णयामुळे श्रमकरी तरुणांच्या शिक्षणाची व्यवस्था रात्रीच्या शाळांमध्ये करणाऱ्या काही मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ होण्याच्या लाभापासून वंचित ठेवले गेले. रात्रशाळेतील कर्मचाऱ्यांच्या असाधारण सेवांचा विचार करून शासन निर्णय दिनांक १७ मे २०१७ प्रमाणे या कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्णवेळ करण्याची कार्यवाही पुन्हा सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सत्यजीत तांबे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४०, ४१, ४२, ४३ व ४४**

(४०) "राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये मराठी पुस्तक विक्री केंद्रांची संख्या ३५ पेक्षाही कमी झाल्याचे निदर्शनास आले असून, परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांवरील दुकानांवर मोठया प्रमाणात भाडे आकारत असल्याने ही दुकाने बंद पडत आहेत; तरी मराठी भाषा व वाचनसंस्कृतीच्या जतनासाठी शासनाने बस स्थानकांवरील पुस्तक गाळयांचे भाडे नियंत्रित करून त्यांना विशेष सवलत द्यावी आणि मराठी पुस्तक विक्री दुकानांच्या पुनरुज्जीवनासाठी तातडीने स्वतंत्र प्रोत्साहनपर धोरण लागू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४१) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना

सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४२) ''राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४३) ''राज्यात मुख्यतः शाळांमध्ये अंमली पदार्थाची वाढत असलेली विक्री व अंमली पदार्थांचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन याबाबत शासनाने शाळा तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरू करून अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी कडक कारवाई व उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४४) ''राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली असमाधानकारक कामगिरी लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत, अशा केंद्रांना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४५**

(४५) मागील काही दिवसांपासून सातत्याने राज्यातील स्थानिक, राष्ट्रीय व बहूराष्ट्रीय कंपन्यांकडून, कामगार महिलांनी कंपनीतील वरिष्ठांच्या शारीरिक, आर्थिक व मानसिक शोषणाच्या तक्रारी केल्या असता दोषींवर कारवाई करण्याऐवजी पीडितांनाच कंपनीतून /कामावरून काढण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ लक्षात घेता अश्या सर्व खाजगी कंपन्यांमध्ये POSH कायद्याचा प्रभावी अंमल करणे यासह आयसीसी व इतर समित्यांच्या माध्यमातून अश्या अपराध्यांवर कठोर कारवाई व्हावी यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या १० सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्याची शिफारस ही परिषद शासनास करत आहे.

**डॉ. परिणय फुके वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४६, ४७, ४८, ४९ व ५०**

(४६) ''विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४७) ”राज्यात विशेषत: विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांची स्थिती, विदर्भात प्रामुख्याने छोटे-मोठे प्रकल्प गेल्या २० वर्षापासून मंजूर असूनही अद्याप बऱ्याच प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत, अपुऱ्या अनुशेषाअभावी भुसंपादन व पर्यावरण विषयक बाबींमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या, अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, विदर्भात प्रकल्पांची प्रलंबित कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४८) “देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देवून त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर “भारतरत्न” प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४९) ”राज्यात विशेषत: विदर्भातील जिल्हा व ग्रामीण रुग्णालयांची स्थिती दयनीय आहे, रुग्णालयांतील सोयीसुविधा योग्य नसल्यामुळे दुर्बल घटकातील रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत, त्यातच तज्ज्ञ डॉक्टरांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, रुग्णालयातील देखभाल योग्यरित्या होत नसल्याने रुग्णालयांना आग लागण्याचे प्रकार मागील काही वर्षांत भंडारा, नागपूर, मुंबई व इतरही ठिकाणी घडले आहेत, यामुळे कित्येकांचे मृत्यू झाले आहेत, त्यामुळे रुग्णालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन रुग्णांना योग्य सोय व उपचार होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने योग्य पाऊल उचलावे व रुग्णालयाची स्थिती सुधारण्याकरिता भरीव निधी उपलब्ध व्हावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे.”

(५०) ”राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५१ व ५८**

(५१) स्वातंत्र्यपूर्व काळापासून अमरावती जिल्ह्यातील अचलपूर ते यवतमाळ या लोहमार्गावर शकुंतला ही नॅरोगेज रेल्वेसेवा कार्यरत असून, नॅरोगेजमुळे या रेल्वेच्या वेगावर मर्यादा येणे, या रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याबाबत सन २०१० पासून केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे, सदर प्रकल्पाचा तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर असूनही अद्याप या कामास प्रत्यक्ष सुरुवात न झाल्याने सध्या शकुंतला रेल्वेसेवा बंद असणे, या प्रकल्पाच्या विलंबामुळे विदर्भातील नागरिकांना स्वस्त, सुलभ आणि पर्यायी वाहतूक सुविधांपासून वंचित राहावे लागणे, प्रस्तावित ब्रॉडगेज रूपांतरण आणि रेल्वे स्थानकांचे नूतनीकरण रखडल्यामुळे या भागाच्या सामाजिक व आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होणे, शकुंतला रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये तातडीने रूपांतर करून, रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण व नूतनीकरण करण्यासाठी कालबद्ध

योजना त्वरित राबवावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(५८) "पावसाच्या अनियमिततेमुळे राज्यातील शेती व्यवसायात सातत्याने होत असलेले नुकसान यामुळे शेतकरी पूर्णतः हवालदिल होणे, शेतकऱ्यांवर वाढते कर्ज, खरेदी केंद्रावर पिकाला मिळणारा कमी भाव तसेच योग्य बाजारभाव न मिळणे, यामुळे वाढत जाणाऱ्या आर्थिक संकटाला सामोरे जाण्याची ताकद न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर राज्यात शेतकरी आत्महत्या करणे, शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव मिळावा यासाठी किमान आधारभूत किंमत (MSP) ठरवताना सध्याच्या 'A2+FL' या अपूर्ण सूत्राऐजी डॉ. एम. एस. स्वामिनाथन आयोगाने शिफारस केलेल्या 'C2' (सर्वसमावेशक खर्च) या सूत्राचा आधार घ्यावा, शेतजमिनीचे काल्पनिक भाडे आणि भांडवली व्याज मोजून येणाऱ्या एकूण 'C2' उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा जोडून सुधारित व वाढीव हमीभाव धोरणात्मकरित्या जाहीर करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५२, ५३, ५४, ५५ व ५६**

(५२) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५३) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५४) "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५५) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५६) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अंबादास दानवे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५९, ६०, ६१, ६२ व ६३**

(५९) "मराठवाडा क्षेत्रात अवर्षणामुळे व सिंचनाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, या क्षेत्रातील ७५ टक्के उद्योगधंदे बंद असणे, उत्पन्नाची साधने नसल्याने खालावत असलेले जीवनमान, पुरेशा आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा यांचा अभाव, परिणामी, मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत निम्म्यापेक्षाही कमी असल्याचा जाहीर करण्यात आलेला अहवाल विचारात घेता मराठवाडयातील मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी उपाययोजना अंमलात आणण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६०) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपतग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६१) "राज्यातील क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी होत असणे. या विभागामार्फत युवक व क्रीडा क्षेत्रासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना मर्यादित स्वरूपाच्या असून सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपलब्ध होणारा निधी अपूरा असणे, त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर असलेल्या तरुणांना योग्य दिशा संधी आणि सहाय्य मिळत नसणे. युवकांना शिक्षण, रोजगार, उद्योजकता, जीवनशैली सुधारणा, नाविन्यता, व्यक्तिमत्व विकास यादी विविध बाबतीत सक्षमपणे मार्गदर्शन मिळेल अशा केंद्रामार्फत शासकीय योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, करिअर प्लॅनिंग, क्रीडा संधी, उद्योजकतेचे प्रशिक्षण, स्कील डेव्हलपमेंट इत्यादी सेवा तरुणांना एकाच छताखाली उपलब्ध होतील. म्हणूनच, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात युवकांसाठी सर्वसमावेशक माहिती व मार्गदर्शन देणारी "युवक व क्रीडा कल्याण माहिती केंद्र" तातडीने स्थापन करण्यात यावीत आणि त्यासाठी आवश्यक विधेयक, संरचना व निधी सुनिश्चित करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६२) "राज्यातील मोठ्या व मध्यम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने निश्चित स्वरुपाचा एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६३) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक

आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अभिजित वंजारी वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६४, ६५, ६६, ६७ व ६८**

(६४) "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६५) "अमरावती जिल्हयातील चिखलदरा हे निसर्ग संपत्तीने संपन्न असलेले वनक्षेत्र असून येथील वनक्षेत्रात विविध वनस्पती, प्राणीजीव अस्तित्वात आहेत. चिखलदऱ्यामध्ये मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. निसर्गाने नटलेल्या चिखलदरा हा जागतिक पर्यटकांना आकर्षित करीत असून चिखलदराला राष्ट्रीय पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करावे, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे."

(६६) "राज्यातील 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका यांना उत्पन्नाचे स्त्रोत कमी असणे, गृह कर व इतर अतिरिक्त कर वाढविण्याला मर्यादा असणे, त्यामुळे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात विकासाला खीळ बसणे, खेडे गावातील लोकसंख्या कमी होऊन शहरी लोकसंख्या सातत्याने वाढत असणे, ग्रामीण भागासाठी अनेक योजनांमधून पायाभूत विकासाकरिता निधी उपलब्ध होत असतो, त्याचप्रमाणे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात पायाभुत विकासाकरिता शासनाने विशेष अनुदान द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(६७) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविलेले असताना त्याबाबतचे लाभ ज्येष्ठ नागरीकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या हितासंबंधी धोरण ठरवून जनजागृती होण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरीकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन (मदतकेंद्र) व संकेतस्थळ सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६८) "राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांचे आर्थिक लेखापरिक्षण तपासण्यासाठी राज्य विधानमंडळाची पंचायत राज समिती अस्तित्वात आहे. त्याच धर्तीवर महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत यांचे लेखा परिक्षण तपासण्यासाठी विधीमंडळाची समिती गठीत करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**पंधरा** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा.

**सोळा** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन,**
**मंबई,**
**दिनांक : २१ जून, २०२६.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव** - 3,
**महाराष्ट्र विधानपरिषद**